# बृहन्मुंबई महानगरपालिका

**घनकचरा व्यवस्थापन 'ई' विभाग**

**स.अभि./ई/२४९९५/घ.क.व्य./दि.१७.०२.२०२५.**

विषय:- 'ई'विभागात 'रमजान' सणानिमित दि.०१.०३.२०२५ ते दि.०२.०४.२०२५ पर्यत स्वयंसेवकांमार्फत साफसफाई करण्याकरिता अशासकिय संस्थांची प्रभागनिहाय नियुक्ती करण्याबाबत.

**"स्वारस्य अभिव्यक्ती"**

**जाहिरात**

'ई' विभाग, घन कचरा व्यवस्थापन खात्यात स्वच्छतेबाबत साफसफाईच्या कामाकरीता 'रमजान' सणानिमित दि.०१.०३.२०२५ ते दि.०२.०४.२०२५ पर्यत स्वयंसेवकांमार्फत साफसफाई करण्याकरिता अशासकिय संस्थांची प्रभागनिहाय नियुक्ती करण्यासाठी इच्छुक नोंदणीकृत मजूर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा, सहकारी संस्था, अशासकीय संस्था इ. संस्थेमार्फत कामगारांचा पुरवठा करण्याकरीता संस्थेची निवड, पात्रता यादी तयार करुन सोडत पध्दतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवित आहे.

| अ. क्र. | योजनेचे नाव | कामासाठी निवड करावयाच्या संस्था |
|---|---|---|
| १. | रमझान महिना (रमझान ईद) सणानिमित्त साफसफाईचे काम | ०७ |

अर्जाचा नमुना 'ई' विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे रु. ३३०/- + (९% राज्य सरकार +९% केंद्र सरकार = १८% (एकुण रु.३९०/-) रोख स्वरुपात किंवा राष्ट्रीयकृत बॅकेचा डी.डी. **बृहन्मुंबई महानगपालिका (Municipal Corporation of Greater Mumbai)** या नावाने (ना-परतावा) नागरिक सुविधा केंद्र **(C.F.C.)** येथे जमा केल्यानंतर अर्ज दि.१७.०२.२०२५ ते दि.२४.०२.२०२५ सकाळी १०.३० ते संध्याकाळी ०४.०० (कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी) या वेळेत मिळू शकेल. पात्र संस्थांची यादी व सोडतीचा दिनांक 'ई' विभाग कार्यालय येथे सूचना फलकावर लावण्यात येईल. पात्र संस्थांच्या यादीमधून सोडत पध्दतीने यशस्वी झालेल्या संस्थाना कामाचे वाटप योजनेच्या अटी व शर्तीनुसार करण्यात येईल. प्रत्येक कामासाठी स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र रक्कम भरणे आवश्यक आहे.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी 'ई' विभाग, घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क साधावा. संस्थेने 'ई' विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दि.२५.०२.२०२५ दुपारी ०१.०० वाजेपर्यंत आहे.

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधीनंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

सही/-
सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.)
'ई' विभाग